नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक ०७/१०/२०२२ (मंगळवार)**

**(दुपार)**

---

## फसवणुक

**पो.स्टे. बोरी** :– अंतर्गत मौजा ग्रॅडविल कॉलनी इरा शाळे जवळ, प्लॉट नं १३९ सोनकुवे यांचे घरी सातगाव बुटीबोरी येथे दिनांक २२/०९/२०२२ ते ०७/१०/२०२२ चे ११.३० वा. आरोपी क्र. १. मोहम्मद रियाज, रा.पुणे व २. हिमांशु रा. दिल्ली यांनी फिर्यादी नामे– आकाश पांडुरंग जांभुळकर, वय २२ वर्ष, रा.लाखनी जि.भंडारा ह.मु. ग्रॅडविल कॉलनी इरा शाळे जवळ प्लॉट नं १३९ सोनकुवे यांचे घरी सातगाव बुटीबोरी याला लॅपटॉपची ऑफर देउन त्याचे पेटीएम व्दारे २३,९४०/–रू. घेउन लॅपटॉप पाठवितो परंतु लॅपटॉप न पाठविता टाळाटाळ करून फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार पारधी मो.नं. ७७४१०२२७३१ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**१) पो.स्टे. रामटेक** :– अंतर्गत ०७ कि. मी. अंतरावरील रूद्रा धाबा नवरगाव येथे दिनांक ०५/१०/२२ चे १९.०० वा. ते १९.३० वा. सुमारास लोकेश नंदकिशोर रहांगडाले(मृतक), वय २२ वर्ष, रा. नांदगाव तह. मौदा हा आपले एमएच–४०/सीजे–८९३४ क्रमांकाच्या मोटरसायकलने नांदगाव वरून रेयतवाडी जि. शिवनी येथ देवाला चादर चढविण्याकरीता जात असतांना रूद्रा धाब्यासमोर नवरगाव येथे रामटेक कडुन तुमसर कडे जाणारा एमएच–२९/बीई– ३७८५ क्रमांकाच्या ट्रकचा चालक आरोपीने आपले वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मोटारसायकला धडक दिली. या अपघातात गंभीर रित्या जखमी होवून जागीच मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– महेंद्र मेहतलाल रहांगडाले, वय ३६ वर्षे, रा. नांदगाव यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ अ भादवी सहकलम १८४, १३४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी श्रीकांत लांजेवार मो.नं. ९७६४१९०९५१ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कळमेश्वर** :– अंतर्गत ०६ कि. मी. अंतरावरील मौजा घोगली शिवार येथे दिनांक २०/०९/२२ चे २०.३० वा. सुमारास दिपक हरीराम गोतमारे (मृतक), वय ५५ वर्ष, रा. प्लॉट नं. ७८ न्यु महात्मा गांधीनगर हुडकेश्वर रोड नागपुर, गणपती मंदीरजवळ नागपुर हे आपले एमएच–३१/एके– ३१८९ क्रमांकाच्या मोटरसायकलने घोराड वरून घोगली आपल्या शेतात जात असतांना सोनु हरबडे यांचे शेताजवळ अचानक त्यांची मोटारसायकल स्लीप झाल्याने ते रोडवर खाली पडले. या अपघातात त्यांचे डोक्याला गंभीर मार लागल्याने ते जखमी झाले. त्यांना उपचाराकरीता मेडीकल कॉलेज ट्रामा सेंटर नागपुर येथे नेले असता दि. ३०/०९/२०२२ रोजी मरण पावले. मर्ग क्र. ८६/२२ कगलम १७४ जा.फौ. चे चौकशीवरून व फिर्यादीचे रिपोर्टवरून सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– नाना उर्फ कांतेश्वर हरीराम गोतमारे, वय ४६ वर्ष, रा. प्लॉट नं. ७८, न्यु महात्मा गांधीनगर हुडकेश्वर रोड, नागपुर गणपती मंदीरजवळ नागपुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ अ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि मेश्राम मो.नं. ९०७५२४५०५९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**